दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १९७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२७ फेब्रुवारी २०२५





## थोडक्यात

### महाशिवरात्रीची आंघोळ जिवावर बेतली...

**दि.२६, चंद्रपूर :** राजुरा तालुक्यापासून जवळ असलेल्या चुनाळा येथील घराजवळील नागरिकांसोबत महाशिवरात्रीच्या पर्वावर वर्धा नदी येथे आंघोळ करण्यासाठी गेलेल्या तुषार शालिक आत्राम (१७) मंगेश बंडू चणकापुरे (२०) अनिकेत शंकर कोडापे (१८) वरील सर्व राहणार चुनाळा यांना खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तिन्ही युवकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना आज बुधवार (दि. २६) दुपारी १ वाजता घडली आहे. महाशिवरात्री निमित्त चुनाळा येथील काही नागरिक चुनाळा येथील वर्धा नदी घाटावर आंघोळ करण्यासाठी जात असता त्यांच्यासोबत घराजवळील तुषार आत्राम, मंगेश चणकापुरे, अनिकेत कोडापे हे तिन्ही युवक आंघोळ करण्यासाठी गेले नदीपात्रात महिला एका बाजूला आंघोळ करीत असताना महिलापासून दूर काही अंतरावर जाऊन तिन्ही युवक आंघोळ करीत होते. यावेळेस त्यांना खोल पाण्याचा अंदाज न आल्याने ते पाण्यामध्ये बुडू लागले वेळेस त्यांच्या ओरडण्याचा आवाज आला असता जवळ असलेला रामचंद्र रागी या युवकांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना वाचविण्यात यश आले नाही. घटनेची माहिती चुनाळाचे सरपंच बाळनाथ वडस्कर यांना मिळताच त्यांनी राजुरा पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी राजुरा पोलिस पोहचली सदर घटना बल्लारपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने बल्लारपूर पोलिस सुद्धा घटनास्थळी दाखल होऊन मृतदेहाचा शोध घेऊ लागले. राजुराचे तहसीलदार डॉ. ओमप्रकाश गोंड यांनी आपत्ती विभाग चंद्रपूर येथे फोन करून बोटीची व्यवस्था केली व बोटीद्वारे मृतदेहाचा शोध घेणे सुरू आहे. वृत्त लिहीपर्यंत मृतदेह मृतदेह मिळाले नाही. मागील वर्षी याचा ठिकाणी चुनाळा येथील मासिरकर यांचा मुलगा बुडाला होता.

# धक्कादायक ! पुण्यात शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, पुणे :** गावी निघालेल्या तरुणीवर शिवशाही बसमध्ये बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे बुधवारी सकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी आरोपीचे नाव निष्पन्न केले असून त्याचा शोध घेण्यास पोलिसांची आठ पथके रवाना झाली आहेत. दत्तात्रय रामदास गाडे असं या प्रकरणातल्या आरोपीचं नाव आहे. ही घटना नेम की कशी घडली हा सगळा घटनाक्रम उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी सांगितला आहे.



**पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील काय म्हणाल्या?**

पीडित मुलगी पुण्यात काम करते. ती सातारा या ठिकाणी तिच्या गावी चालली होती. सकाळी साधारण पावणेसहाच्या सुमारास ती बसची वाट बघत होती. त्यावेळी आरोपी तिकडे गेला होता. आरोपी तिच्याशी बोलला असंही दिसतं आहे आणि त्यानंतर तिच्या शेजारचा माणूस उठून निघून गेला हेदेखील दिसतं आहे. आरोपीने गोड बोलून तिच्याशी ओळख करुन घेतली आणि कुठे जाते आहेस असं विचारलं त्यावर मुलीने फलटणला जायचं आहे. तर त्याने तिला सांगितलं बस इथे नाही तर दुसऱ्या ठिकाणी लागते. चल मी तुला बसजवळ घेऊन जातो. सीसीटीव्ही फुटेजमध्ये ती मुलगी आरोपीसह बसजवळ जाताना दिसते आहे. अशी माहिती स्मार्तना पाटील यांनी दिली.

**बसमध्ये अंधार होता त्याचा फायदा घेऊनच आरोपीने दुष्कृत्य केलं - पाटील**

स्मार्तना पाटील पुढे म्हणाल्या, बसमध्ये अंधार होता, त्यावर ती आरोपीला म्हणाली की या बसमध्ये तर अंधार आहे. तर आरोपी तिला म्हणाला ही बस रात्री आली आहे. लोक झोपले असतील म्हणून अंधार आहे.

तुला हवं तर तू चेक कर. तिला बसमध्ये जायला सांगितलं. सदर म ुलगी अंधार का आहे हे बघायला आतमध्ये गेली. तेव्हा आरोपी तिच्या मागोमाग बसमध्ये शिरला त्याने बसचा दरवाजा लॉक केला आणि त्यानंतर तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर आरोपी उतरुन गेल्याचंही सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसतं आहे. तसंच मुलगीही उतरली आणि बसने गावी जायला निघाली होती. या दरम्यान तिने हा प्रकार तिच्या मित्राला सांगितला. अर्ध्या रस्त्यात गेल्यानंतर तिने हा सगळा प्रकार मित्राला सांगितला. मित्राने तिला सांगितल्यानंतर ती आमच्याकडे म्हणजेच पोलीस ठाण्यात आली. तिच्या तक्रारीनंतर आम्ही सीसीटीव्ही फुटेज तपासलं. आरोपी हा शिरुर गावातला आहे असं कळलं आहे. त्याची ओळख पटली आहे, त्याला शोधण्यासाठी आठ पथकं रवाना झाली आहेत. डॉग स्कॉडही शोध घेतो आहे. असं स्मार्तना पाटील यांनी म्हटलं आहे.

**रुपाली चाकणकर यांनी काय प्रतिक्रिया दिली आहे?**

पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. अनेक तालुक्यातील वाड्या-वस्त्यांमधून मुली शिकायला पुण्यात येत असतात. तसं पाहिलं तर पुण्यात मुली कायम सुरक्षित राहिल्या आहेत. पुण्यात शिकायला येणाऱ्या मुलींना सुरक्षित वाटत असतं. पण स्वारगेट येथे घडलेली घटना अत्यंत धक्कादायक आहे.

# अफगाणिस्तानचा इंग्लंडवर थरारक विजय ! इंग्लंड रेसच्या बाहेर...

अफगाणिस्तान संघाचा आयसीसी स्पर्धेत अजून एक मोठा उलटफेर केला आहे. अफगाणिस्तानने इंग्लंडचा चॅम्पियन्स ट्रॉफीत ८ विकेट्सने पराभव करत मोठा अपसेट केला. यासह इंग्लंडचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील आव्हान संपुष्टात आले आहे. तर अफगाणिस्तानचा संघ अजूनही उपांत्य फेरी गाठण्याच्या शर्यतीत कायम आहे. अफगाणिस्तानकडून अझमतुल्ला उमरझाईने ५ विकेट्स तर इब्राहिम झादरानने १७७ धावांची खेळी केली, जे संघाच्या विजयाचे हिरो ठरले.

इब्राहिम झद्रानचे (१७७) शानदार शतक आणि अझमतुल्ला ओमरझाई (४१ धावा आणि ५ विकेट) याच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर अफगाणिस्तानने शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात इंग्लिश संघाचा अवघ्या ८ धावांच्या फरकाने पराभव केला. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि अफगाणिस्तानने पहिल्यांदा आयसीसी स्पर्धेत ३०० धावांचा पल्ला पार केला. यासह अफगाणिस्तानने ३२५ धावांचा टप्पा गाठला. इब्राहिम झादरानची १७७ धावांची वादळी खेळीने संघाच्या या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला.



लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात दोन्ही संघांची सुरुवात खराब झाली. पण अफगाणिस्तानने कमालीचं पुनरागमन करत ३२५ धावा केल्या. झादरानने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अफगाणिस्तानसाठी पहिलं शतक झळकावले आणि त्यानंतर या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठी खेळी खेळताना १७७ धावा केल्या. अफगाणिस्तानने ९व्या षटकातच संघाने ३ विकेट गमावल्या. हे तीन विकेट स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने घेत अफगाणिस्तानला अडचणीत आणले. पण इथून इंग्लंडच्या गोलंदाजीची अवस्था बिकट झाली आणि अफगाणिस्तानने पुनरागमन केले.

अफगाणिस्तानने ३७ धावांत ३ विकेट गमावल्यानंतर इब्राहिम झादरानने कर्णधार हशमतुल्ला शाहिदीबरोबर शतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. शाहीदीने ४० धावा केल्या. तर यानंतर अझमतुल्ला ओमरझाईने ४१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. यानंतर मोहम्मद नबीने तर इंग्लिश संघाची धुलाई करत २४ चेंडूत ३ षटकार आणि २ चौकारांसह ४० धावा केल्या. झादरान आणि नबीने २०० च्या स्ट्राईक रेटने ५० चेंडूत शतकी भागीदारी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. इंग्लंडकडून आर्चरने ३ विकेट्स, ओव्हरटन, रशीदने १-१ तर लिव्हिंगस्टोनने २ विकेट्स घेतले.

# केईएममध्ये वृद्ध महिलेवर दुर्मिळ हृदयशस्त्रक्रिया !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** मुंबई महापालिकेच्या परळ येथील केईएम रुग्णालयातील हृदयविकार विभागात वर्षानुवर्षे हृदयविकारावर नाविन्यपूर्ण उपचार केले जातात. केईएमच्या शताब्दी वर्षानिमित्तानेही अनेक उपक्रम हृदयविकार विभागात राबविण्यात आले असून दोनच दिवसांपूर्वी बारामतीच्या ७१ वर्षांच्या रखमा आजीवर अत्यंत जटील हृदयशस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुण्यातील रुग्णालयात दहा वर्षांपूर्वी या आजींचा व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट करण्यात आला होता. त्यानंतरही हृदयविकाराचा त्रास होत असल्यामुळे पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे ओपनहार्ट शस्त्रक्रियेचा पर्याय देण्यात आला. मात्र यात मोठा धोका असल्यामुळे त्यांनी थेट मुंबईतील केईएम रुग्णालय गाठले. येथे हृदयविकार विभागाचे प्रमुख डॉ. अजय महाजन यांच्या नेतृत्त्वाखाली एक नवीन प्रक्रिया (ट्रान्स कॅथेटर मायट्रल व्हॉल्व्ह) करण्यात आली. आज रखमा आज्जीची प्रकृती उत्तम आहे. एक-दोन दिवसांत त्या आपल्या घरी जातील, असे डॉक्टरांनी सांगितले.

केईएम रुग्णालयाने शतकोत्तर वाटचालीत अनेक बदल केले. अनेक सुधारणा केल्या. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करत रुग्णहित जपण्याचे काम केले. केईएमच्या हृदयविकार विभागातही आज अनेक बदल होत आहेत. नाविन्यपूर्ण संकल्पना स्वीकारल्या जात आहेत. रखमा आज्जीवर करण्यात आलेली हृदयप्रक्रिया या नाविन्यतेचा एक नवा अध्याय म्हणावा लागेल. श्वसनाचा त्रास होत



असल्यामुळे पुण्याहून ७१ वर्षीय आजींना केईएमच्या हृदयविकार विभागात दाखल करण्यात आले. त्यांना हृदयरोग असल्याचे स्पष्ट होते. १० वर्षांपूर्वी त्यांचा व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट करण्यात आला होता व प्रोस्थेटिक व्हॉल्व्ह बसवण्यात आला होता. व्हॉल्व्ह खराब झाल्यामुळे रुग्णाला त्रास होत होता. यावर आजींना ओपन हार्ट सर्जरीचा पर्याय देण्यात आला होता. परंतु त्यांचे वय लक्षात घेता तसेच अन्य शारीरिक समस्या लक्षात घेतल्यास ओपन हार्ट सर्जरी करणे त्यांच्यासाठी धोक्याचे होते.

त्यामुळे ट्रान्ससोफेजियल इकोकार्डियोग्राफी व भूल देणे धोकादायक होते. या सर्व परिस्थितीचा विचार करून डॉ अजय महाजन व त्यांच्या टीमने ट्रान्स कॅथेटर मायट्रल व्हॉल्व प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. या प्रक्रियेत मर्यादित भूल देऊन हृदय शस्त्रक्रियेशिवाय नवीन कृत्रिम व्हॉल्व्ह बसविण्यात येतो. यात पायामधून कॅथेटर टाकून मायट्रल व्हॉल्व्हमध्ये करत कृत्रिम व्हॉल्व्ह घालण्यात आल्याचे डॉ. महाजन यांनी सांगितले. या शस्त्रक्रियेत हृदयविकार विभागाचे प्राध्यापक डॉ. चरण लांजेवर, डॉ. श्रेयस रावत, डॉ. गिरीश सबनीस तसेच भूलतज्ज्ञ डॉ. संगीता उंबरकर, डॉ. धीरज कुमार तसेच हृदयशस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख डॉ. उदय जाधव यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे ही अत्यंत अवघड प्रक्रिया यशस्वी झाल्याचे डॉ. महाजन म्हणाले. आमच्या सर्वच धाडसी निर्णयांना अधिष्ठाता डॉ. संगिता रावत यांचे पूर्ण सहकार्य असते, असेही त्यांनी सांगितले.

केईएम रुग्णालयाच्या शताब्दी निमित्तानेही हृदयविकार विभागाने रोटा आणि आय. व्ही. यू. एस.च्या मदतीने अँजिओप्लास्टी कार्यशाळेचे आयोजन केले होते. हा एक गुंतागुंतीचा कोरोनरी हस्तक्षेप आहे. फारच थोड्या हृदयविकारावर उपचार करणाऱ्या संस्था व रुग्णालयात केला जातो. या प्रक्रियेचा वापर गंभीर कॅल्सिफाइड कोरोनरी जखमांवर उपचार करण्यासाठी केला जातो.

यात हृदयाकडील रक्तवाहिन्या कॅल्शियममुळे हाडांसारख्या घट्ट होतात. ही एक आव्हानात्मक प्रक्रिया असून त्यासाठी असाधारण कौशल्याची आवश्यकता असते. रोटेशनल एथेरेक्टॉमी उपकरण कॅल्सिफाइड प्लेकच्या भौतिक गुणधर्मांमध्ये बदल करते यामुळे स्टेंट जखमेतून जाऊ शकतात. केईएमच्या हृदयविकार विभागाचे प्रमुख प्राध्यपक डॉ. अजय महाजन व प्राध्यापक डॉ. चरण लांजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सायन रुग्णालयाच्या हरदयविकार विभागाचे प्रमुख डॉ. पी. जे. नथानी तसेच सहाय्यतक प्राध्यापक डॉ. मिलिंद फडके, सहाय्यक प्राध्यापक, डॉ. श्रेयस रावत हे या कार्यक्रमाला विशेष आमंत्रित होते. तर प्राध्यापक डॉ. हेतन शाह, डॉ. गिरीश सबनीस, डॉ. धीरज कुमार यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## शांत सरकार झोपले आहे.... आव्हाडांची सरकारवर टीका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, पुणे :** पुणे शहरातील स्वारगेट येथील बसस्थानकावर शिवशाही बसमध्ये एका तरूणीवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बुधवारी सकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी आरोपीचे नाव उघड केले असून त्याचा शोध घेण्यास पोलिसांची आठ पथके रवाना झाली आहेत. दत्तात्रय रामदास गाडे असं या प्रकरणातल्या आरोपीचं नाव आहे.

दरम्यान या धक्कादायक घटनेचे पडसाद सध्या राजकीय वर्तुळात उमटताना दिसत आहेत. विरोधकांकडून सत्ताधारी पक्षांवर जोरदार टीका केली जात आहे. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या बलात्काराच्या घटनेवर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे. शांत सरकार झोपले आहे, असे म्हणत या पोस्टमधून त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे.

आव्हाडांनी त्यांच्या पोस्टमध्ये आव्हाडांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच पीडित मुलीला झालेला प्रकार कुणाला तरी सांगावा वाटला नाही यात समाज म्हणून आपल्या सर्वांचा पराभव आहे असेही आव्हाड म्हणाले आहेत.

**जितेंद्र आव्हाडांची पोस्ट !**

राज्यातील पोलीस प्रशासनाची संवेदनशीलता आणि महिलांची सुरक्षितता रसातळाला गेल्याची परिस्थिती आहे. स्वारगेट बसस्थानकात तरुणीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेला कित्येक तास उलटून गेले तरी आरोपी अजून पोलिसांच्या हाती लागलेला नाही. याउलट पोलीस प्रशासन पीडित तरुणीलाच दोष देण्याचं काम करत आहे. घडलेल्या प्रसंगानंतर तरुणीची मानसिक स्थिती काय असेल याची एकुलत्या एका मुलीचा बाप म्हणून कल्पनाही करवत नाही. झाला प्रकार या तरुणीला लगेच कुणाला तरी सांगावा वाटला नाही यात आपल्या सर्वांचा समाज म्हणून मोठा पराभव आहे. सार्वजनिक ठिकाणी सुद्धा महिला असुरक्षित आहेत आणि या प्रसंगाच्या निमित्ताने महिला सुरक्षेचे अनेक प्रश्न उभे राहतात, असे म्हणत आव्हाडांनी स्वारगेट बस स्थानकातील प्रशासकिय व्यवस्थेबद्दलच्या काही समस्या मांडल्या आहेत.

**१) स्वारगेटचे नेहमीचे प्रवासी सांगतात की,**
**स्वारगेट बस स्थानकात रात्री पुरेसा प्रकाश नसतो.**
**२) बस गाड्या नियोजित फलाटावर लागत नाहीत.**
**३) आगार व्यवस्थापक चौकशीसाठी येणाऱ्या प्रवाशांना व्यवस्थित माहिती देत नाहीत.**
**४) रात्री मुक्कामी असणारी बस लॉक का नव्हती?**
**५) घटनास्थळापासून स्वारगेट पोलीस स्टेशन अवघ्या हाकेच्या अंतरावर असूनही तिथे पोलीस रात्रभर गस्त का घालू शकत नाहीत?**

## संपादकीय



### गझल सम्राट...

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे.

नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली.

त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# माझी मराठीची बोलू कौतुके...परी अमृतातही पैजा जिंके....

मराठी ही आपली मातृभाषा आहे तसेच ती महाराष्ट्राची राज्यभाषाही आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शैलीदार लेखणीतून ज्यांनी मराठी भाषेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले ते जेष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्म दिवस. कुसुमाग्रजांना १९८७ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. हा मराठी भाषेला मिळालेला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार होता. त्यामुळे त्यांचा जन्मदिवसच मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यास महाराष्ट्र शासनाने सुरवात केली. भारतातील २२ प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक प्रमुख भाषा आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्याची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही पंधरावी तर देशातील तिसरी भाषा आहे. २००१ च्या लोकसंख्येनुसार मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या दहा कोटींच्या पुढे आहे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. मराठी भाषेला गौरवपूर्ण इतिहास आहे. देशातीलच नव्हे तर जगातील प्रमुख भाषा म्हणून मराठीकडे पाहिले जाते. ज्ञानेश्वरांपासून कुसुमाग्रजांपर्यंत अनेकांनी मराठी भाषेला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

**माझी मराठीची बोलू कौतुके**
**परी अमृतातही पैजा जिंके**
**ऐसी अक्षरे रसिके....मेळवीन**

अशा शब्दात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठीचा गौरव केला आहे.

लाभले आम्हास भाग्य...
बोलतो मराठी...

अशा शब्दात कविश्रेष्ठ सुरेश भटांनी मराठीचा गौरव केला आहे.

एक हजार वर्ष जुनी, पाच हजार बोली भाषेपासून तयार झालेली, अमृतातही पैज जिंकणाऱ्या या माय मराठी भाषेच्या जपणुकीसाठी आपण काय करतो याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. आज हिंदी आणि इंग्रजी भाषांनी मराठी भाषेवर आक्रमण केले आहे. इंग्रजी व हिंदी भाषेच्या आक्रमणाने महाराष्ट्रातूनच मराठी भाषा हद्दपार होती की काय अशी शंका येऊ लागली आहे. अर्थात याला सर्वस्वी मराठी माणसेच जबाबदार आहे. मराठी माणसांच्या मनातच मराठीला गौण स्थान आहे आणि इंग्रजी भाषेला प्रथम स्थान आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. इंग्रजीला ज्ञानभाषा म्हटले जाते म्हणून मराठीची उपेक्षा केली जात आहे. विशेषतः उच्चभ्रू मराठी कुटुंबात मराठीत बोलणे अप्रतिष्ठित समजले जाते तर इंग्रजी भाषेत बोलणे प्रतिष्ठेचे समजले जाते. मराठी ही मातृभाषा असूनही इंग्रजीतून बोलण्याचा अट्टहास धरला जातो. मराठी माणसे एकमेकांशी बोलताना मराठीत बोलायला कचरतात. मराठीपेक्षा इंग्रजी आणि हिंदीतून बोलणे प्रतिष्ठेचे समजतात. मराठी माणसेच आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल करण्याऐवजी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत भरमसाठ फी भरुन दाखल करीत आहे. इंग्रजी भाषेचे अवास्तव स्तोम माजवल्याने मराठीमाध्यमांच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. मराठी साहित्य संमेलनाकडे मराठी माणसेच पाठ फिरवू लागल्याने मराठी पुस्तकांच्या विक्रीत घट होऊ लागली आहे. ग्रंथालयातील मराठी पुस्तके वर्षानुवर्षे जागेवरूनही हलतही नाही. महाराष्ट्रातच मराठी भाषेची उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे काम मराठी, साहित्यिक व सरकारचे आहे असेच मराठी माणसाला वाटते. मराठी साहित्यिकांना, लेखकांना मराठी भाषेविषयी जन्मजात प्रेम आहेच. अभिमान आहे. मराठी भाषा गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि आकर्षक होईल यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करीतही आहे. महाराष्ट्र सरकारही मराठी भाषा जिवंत रहावी यासाठी प्रयत्न करीत आहे. पण महाराष्ट्र सरकारचे हे प्रयत्न तोकडे आहेत असेच म्हणावे लागेल. मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचे अतिक्रमण वाढत असताना ते रोखण्यासाठी सरकार ठोस प्रयत्न करीत असल्याचे दिसत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मागणी तसा पुरवठा या तत्वाने सरकार भराभर परवानगी देत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सढळ हाताने परवानगी देणारे सरकार नवीन मराठी शाळांना परवानगी देत नाही तसेच आहे त्या शाळांना अनुदान देताना हात आखडता घेते. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर अनिवार्य असताना तिथेही मराठीची गळचेपी होते. अनेक सरकारी कार्यालयात आज देखील मराठीचा वापर नावापुरताच केला जातो. केंद्र सरकारच्या कार्यलयात तर मराठीचा वापर होतच नाही. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर व्हावा असा आदेश असताना त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. मराठी भाषा जगवण्यासाठी, वाचवण्यासाठी राज्य सरकारने खंबीर धोरण आखायला हवे. केवळ परिपत्रक काढून उपयोग नाही तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होते का याचाही शोध सरकारने घ्यावा. राज्य सरकारच्या व्यवहारात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करणे, सरकारच्या दैनंदिन कामकाजात मराठीचा जास्तीतजास्त वापर करणे, मराठी शाळांना जी उतरती कळा लागली आहे त्यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन मराठी भाषेला उर्जितावस्था मिळवून देण्याचा प्रयत्न राज्य सरकारने करावा. मराठी ही अभिजात भाषा आहे. . अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी झगडावे लागले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठ पुरवठा केला. सर्व राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी पक्षभेद विसरुन मराठीसाठी एकत्र येऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा प्रयत्न केले साहित्यिक, लेखक यांनीही यासाठी सामूहिक प्रयत्न केलेत. या सर्वाचा परिपाक होऊन अखेर यावर्षी मराठी भाषेवर अभिजात भाषेची मोहोर उमटली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर महाराष्ट्रात उत्साहाचे भरते आले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर १४ कोटी मराठी माणसांची मान अभिमानाने उंचावली. मराठी माणसांनी गेली कित्येक वर्ष पाहिलेले स्वप्न अखेर साकार झाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी माणसांची जबाबदारी आणखी वाढली आहे. मराठी भाषा टिकवण्यासाठी, वाचवण्यासाठी आता सर्वांना सामूहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. मराठी भाषा टिकवण्यासाठी, वाचवण्यासाठी सरकारी तसेच सामाजिक पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. मराठी भाषेला सुगीचे दिवस आणण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. सर्वसामान्य मराठी माणसांपासून सरकारपर्यंत सर्वांनीच मराठीच्या उत्कर्षासाठी आत्मचिंतन करायला हवे.

**मराठी भाषा दिनाच्या समस्त मराठी जनांना हार्दिक शुभेच्छा!!!**

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## कामोठेमधील गॅस शवदाहिनी व कळंबोलीमधील सार्वजनिक शौचालयाचे लोकार्पण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, कळंबोली (पनवेल) :** पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आपण सर्वांनी पाऊल उचलले पाहिजे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिकेच्या विविध कामांच्या शुभारंभावेळी केले.




पनवेल महापालिकेच्या माध्यमातून कामोठे सेक्टर १५ येथे सिडको हस्तांतरीत गॅस शवदाहिनी तसेच कळंबोली मॅकडॉनल्ड समोर सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले आहे. शवदाहिनीचे लोकार्पण आणि सार्वजनिक शौचालयाचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर व आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमांना उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त कैलास गावडे, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, बबन मुकादम, अमर पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका मोनिका महानवर, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, भाऊ भगत, हर्षवर्धन पाटील, हरजिंदर कौर, विद्या तामखडे, प्रदीप भगत, राजेश गायकर, अशोक मोटे, यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

### मराठी गौरव..

मराठी भाषी कपाळा
अभिजात गौरवटिळा
दुग्ध शर्करा योग सार्थ
पुजिता पहिली माळा

नवरात्री शुभशकून हा
घटस्थापनेस सोहळा
मुक्ताई जन्म दिवसांस
शोभे सन्मान हारगळा

संवादा प्रभावीमाध्यम
भाषेचा आब आगळा
अध्ययन अध्यापनाचा
मार्ग जाहला मोकळा

निधि निर्झर अव्याहत
वाहत राही खळखळा
लक्ष्मी सरस्वती कृपेने
भाषा समृद्ध चोखळा

आंतरराष्ट्रीय स्तरावरी
वावर चाले निक्खळा
बहरेल भाषा वैभव ते
विहारे खग विसृंखळा

माझिया माई ममत्वा
सकळालागणारं लळा
म-हाठी समृद्ध भांडारे
अर्थरुप हो शब्दांफळा

अवहेलना अति आतां
चपराकबसेलं नाखळा
भाषाभगिनी ससन्मान
झुकवी आदरे विखळा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**


# या मैत्रीने तर कृष्ण - सुदामा भेटीची आठवण : आ. काशिनाथ दाते

## अपंगत्व आलेल्या वर्गमित्राच्या लेकीच्या लग्नात ५१ हजार रुपयांची भेट!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६,पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कर्जुले हर्या येथील विजयकुमार मारुतराव कोकाटे यांच्या मुलीच्या शुभविवाह प्रसंगी पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघातील आ. काशिनाथ दाते सर यांनी उपस्थित राहुन सन. १९९६ दहावी बॅचने आपल्या अपंगत्व आलेल्या वर्गमित्राला ५१ हजार रुपयांची भेट देताना आ. दाते बोलत होते या मैत्रीने तर कृष्ण - सुदामा भेटीची आठवण आल्याचे गौरवोद्गार आ काशिनाथ दाते यांनी या विवाहात व्यक्त केले.

महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी कामगार म्हणून काम करत असताना अचानक विद्युत प्रवाह सुरू झाल्याने सन २०१६ मध्ये अपंगत्व आले होते. त्यामुळे या कुटुंबातील कर्ता माणसालाच अपंगत्व आल्याने उदरनिर्वाहचा व उपचाराचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे अपंगत्व आलेल्या



विजयकुमार कोकाटे यांची मुलगी वैष्णवी व दशरथ आंधळे यांचे चिरंजीव केतन यांच्या विवाहाच्या निमित्ताने कर्जुले हर्या येथील हरेश्वर विद्यालयातील सन. १९९६ च्या बॅचच्या वर्गमित्र व मैत्रिणींनी ऐच्छिक ५१ हजार रुपयाची मदत गोळा करत फिक्स डिपॉझिट (कायम ठेव) आपल्या अपंगत्व आलेल्या मित्राच्या कोकाटे कुटुंबीयांकडे पावती सुपुर्द केली आहे. त्यामुळे लाडक्या लेकीच्या लग्नात या अनोखा भेटीने कोकाटे कुटुंबीय भारावले असून सर्व मित्र मैत्रिणींनी पुढाकार घेऊन सर्व वर्ग मित्रांनी विजय कोकाटे यांना ५१ हजार रुपये मदत करून तालुक्यात एक चांगला पायंडा चालु केला आहे.

**यांनी जपली अनोखी मैत्री !**

कन्यादानासाठी कोकाटे यांचे वर्गमित्र पारनेर शिवसेना उपतालुकाप्रमुख पंढरीनाथ कारभारी उंडे, अशोक आंधळे, भूमिपुत्र शेतकरी संघटना अशोक कोकाटे, मेजर विजय शिर्के, कुंडलिक वाफारे, पंढरीनाथ बन्सी उंडे, राजेंद्र पवार, रंगनाथ आंधळे, मारुती आंधळे, दिलीप कोकाटे, शांताराम आंधळे, अशोक दातीर, पांडुरंग विधाते, विकास आंधळे, सतीश उंडे, संतोष शेलार, दशरथ आंधळे, संजय आंधळे, शितल आंधळे, नूतन आंधळे, गिरीजा कळमकर, शारदा शिंदे, कमल थोरात, सविता वाफारे, सुरेखा आंधळे, जनाबाई कोकाटे यांनी विशेष पुढाकार घेऊन अडचणीच्या काळातील अनोखी मैत्री जपली आहे.

# बॉलीवूडनंतर आता टॉलीवूड गाजवणार 'छावा'

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' सिनेमाने सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा या चित्रपटाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर मांडण्यात आली आहे. गेली चार वर्षे लक्ष्मण उतेकरांच्या संपूर्ण टीमने या चित्रपटावर मेहनत घेतली होती. २०२१ मध्येच त्यांनी विकी कौशलचं महाराजांच्या भूमिकेसाठी कास्टिंग केलं होतं. या सगळ्या मेहनतीची पोचपावती दिग्दर्शकांना सिनेमा प्रदर्शित झाल्यावर मिळालेली आहे.

'छावा' सिनेमा केवळ महाराष्ट्रातीलच नाहीतर देशभरातील सिनेप्रेमींच्या पसंतीस उतरला आहे. सिनेमाचा क्लायमॅक्स पाहून प्रेक्षक भावुक झाल्याचे अनेक व्हिडीओ गेले काही दिवस सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अनेक ठिकाणी 'छावा'चे शो हाऊसफुल सुरू आहेत. सगळ्या प्रेक्षकांना हा सिनेमा पाहता यावा, तरुण पिढीला महाराजांचा




इतिहास कळावा यासाठी काही भागांमध्ये विशेष शोचं आयोजन देखील करण्यात आलं होतं. 'छावा'ने अवघ्या १२ दिवसांत बॉक्स ऑफिसवर ३७२ कोटींची कमाई केली आहे. सध्या 'छावा' सिनेमाची चर्चा पाहता दाक्षिणात्य सिनेप्रेमींनी हा चित्रपट विविध भाषांमध्ये प्रदर्शित केला जावा अशी मागणी केली होती. अखेर निर्मात्यांनी याबाबत अधिकृत पोस्ट शेअर करत 'छावा' सिनेमा लवकरच तेलुगू भाषेत प्रदर्शित करण्यात येईल असं जाहीर केलं आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## श्री ढोकेश्वर भाविकांची मांदियाळी; मंदिरात घुमला 'हर हर महादेव' चा गजर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथून ईशान्येस ३ किलोमीटर अंतरावरील श्री ढोकेश्वर मंदिरात बुधवार, दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त पुरातन पांडवकालीन लेणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री ढोकेश्वरला भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. पहाटे ५ वाजता महाशिवरात्री पूजेचे मानकरी, पुजारी, सेवेकरी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये महापूजा करण्यात आली. ढोकेश्वर मंदिरातील पिंडीला दही, दूध असा जलाभिषेक करून पुजा आरती करण्यात आली. यानंतर डमरू व शंखनाद करत गोसावी कुटुंबीयांच्या वतीने विधिवत पूजन करून साज चढवला. पहाटेपासूनच अबालवृद्ध भाविकांनी श्रींचे दर्शनासाठी ढोकेश्वर मंदिरात गर्दी केली होती. भाविकांनी ढोकेश्वर महाराज यांचे दर्शन घेऊन मंदिर प्रदक्षिणेचा मार्ग हजारो भाविकांच्या हर हर महादेव, श्री ढोकेश्वर महाराज की जयघोषाने मंदिर परिसर अक्षरशः दुमदुमून गेला होता. यावेळी शिव पिंडीला आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती. सनातन वैदिक हिंदू धर्मामध्ये महाशिवरात्रीला भगवान शिवाची आराधना केली जाते. त्याच पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर परिसरातील जागृत देवस्थान ग्रामदैवत श्री ढोकेश्वर महादेवाचे रूप मानले जाते. यामुळे भाविकांची महाशिवरात्रीनिमित्त श्रींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी असते. महाशिवरात्री निमित्ताने भाविक शिवभक्तांसाठी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने विशाल भंडारा खिचडीचा महाप्रसाद व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

## महाशिवरात्री निमित्त मंदिरांमध्ये हर हर महादेव चा जल्लोष



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२६, माथेरान :** महाशिवरात्रि हिंदू धर्मातील अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र असा सण आहे. आज सकाळपासूनच माथेरानचे ग्रामदैवत पिसरनाथ मंदिरात पिसरनाथ ट्रस्टच्या वतीने अरविंद शेलार, पहलाज निहलानी यांच्या हस्ते शिव अभिषेक करण्यात आला. तर शिवमंदिर येथे मंदिर ट्रस्टच्या व शिवभक्त ग्रुपच्या वतीने अभिषेक कार्यक्रम आयोजित करून येणाऱ्या भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. हा सण वर्षातून एकदा फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या चतुर्थीला होत असताना सर्व भाविक भक्तिरसात रंगून हा दिवस साजरा करत असतात. या दिवशी रात्रभर पूजा व्रत उपासना भजन कीर्तन मंत्र जप अशी केले जातात. अनेक भाविकांनी शिवलिंगावर दूध, मध, पाणी, बेल अर्पण करून महाशिवरात्री व्रत केले. आपली जीवनशक्ती आणि मन शांती वाढवण्यासाठी भगवान शिवाची कृपा प्राप्त करण्यासाठी आज भाविकांनी माथेरान मधील ग्रामदैवत श्री पिसरणाथ मंदिर, शिव मंदिर तसेच वेताळेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. शिवरात्री केव्हा धार्मिकतेचा सण नाही तर आपल्या आत्म्याची शुद्धता साधण्याचा आणि जीवनातील संघर्षावर विजय मिळवण्याचा एक मानला जातो.

## श्री क्षेत्र घुटकेश्वर महादेव मंदिरांत भक्तांची अलोट गर्दी




**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२६, जव्हार (पालघर) :** वाकडपाडा येथे महाशिवरात्र निमित्ताने श्री घुटकेश्वर महादेव मंदिरांत पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी दर्शन घेतले. येथील मंदिर समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन महाशिवरात्री च्या निमित्ताने करण्यात आले होते. यावेळी मंदिर समिती अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मंदिर बांधकामासाठी सहकार्य करणाऱ्या देणगी दारांना सन्मान पत्र शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. सकाळ पासूनच विविध गांवामधुन पायी दिंड्या भजन किर्तनाचा जयघोष करीत श्री घुटकेश्वराच्या दर्शनासाठी येत होत्या. महादेवाच्या पिंडीवर अभिषेक, महाआरती, स्वाध्याय परिवार कार्यक्रम, ह.भ.प.रघुनाथ महाराज झोले यांचे किर्तन रात्री भजन असा संपूर्ण दिवसचा कार्यक्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या भाविकांचे आभार मंदिर समितीचे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मानले.

# प्रधानमंत्री सहाय्यता निधीत खा.लंके राज्यात अव्वल

## खा.लंकेंनी दिल्लीत दाखवली आपल्या कामाची चुणूक



१ कोटी ८६ लाख रूपयांची मदत खासदार नीलेश लंके यांच्या कोट्यातील ३५ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कोटयातील २८ अशा एकूण ६३ रूग्णांना आजवर १ कोटी ८६ लाख रूपयांची मदत मिळवून देण्यात आली आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** प्रधानमंत्री राष्ट्रीय आरोग्य निधीचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून देत खासदार नीलेश लंके यांनी नवी दिल्लीमध्ये ही आपल्या कामाची चुणूक दाखविली आहे. दरवर्षी प्रत्येक खासदाराला असलेला ३५ केसचा कोटा संपल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कोटयातून २७ केसेससाठी निधी मिळवत नीलेश लंके हे सर्वाधिक रुग्णांना लाभ मिळवून देणारे खासदार ठरले आहेत. ५ वर्षांपूर्वी विधानसभेत पारनेर-नगर मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करताना खा.नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा राज्यात सर्वाधिक रुग्णांना लाभ मिळवून दिला होता. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिकृतपणे नीलेश लंके यांनी या योजनेचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून दिल्याचे जाहीर केले होते.

खा.नीलेश लंके यांच्याकडे दररोज अनेक रूग्ण किंवा त्यांचे नातेवाईक उपचारासाठी मदत मिळावी यासाठी येतात. खा.लंके हे रूग्णाच्या आजाराची माहीती घेऊन मुख्यमंत्री अथवा पंतप्रधान सहाय्यता निधीतून त्यास मदत मिळेल का याची खात्री करतात. संबंधित आजार दोन्ही योजनांच्या निकषामध्ये बसती नसतील तर लंके हे स्वतः धर्मदाय रूग्णालयांशी संपर्क करून त्या रूग्णावर उपचार करण्याची व्यवस्था करतात. वेळप्रसंगी सामाजिक संस्थांशी संपर्क करून संबंधित रूग्णास मदत मिळवून देण्यासाठी ही लंके यांची धडपड असते.हजारो रूग्णांना मदतीचा हात कोणत्याही योजनेमार्फत प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्यासाठी खा.लंके यांच्या पारनेर, नगर व मुंबई दिल्ली येथील संपर्क कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा असून या यंत्रणेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांचा दररोज आढावा घेतला जातो. प्रस्तावात काही तृटी असतील तर संबंधित रूग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क करून त्रूटी दुर केल्या जातात. आरोग्याच्या मदतीसाठीची यंत्रणा सतर्क असल्याने गेल्या ५, साडेपाच वर्षात हजारो रूग्णांना आजवर लंके यांच्या माध्यमातून मदत मिळाली आहे.

# खासदार चव्हाण यांची लेंडी धरणाला व मुक्रमाबाद सर्कलमध्ये भेट



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२६, मुखेड (नांदेड) :** दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी नांदेड जिल्ह्याचे खासदार प्रा.रविंद्र चव्हाण यांनी लेंडी धरणाला प्रत्यक्ष भेट देऊन मागच्या ३८ वर्षापासून होत असलेली लेंडी धरणग्रस्तांची या प्रशासनाकडून होत असलेली फरफट ऐकून घेतली. लेंडी धरणाचे भुमिपुजन होऊन ३८ वर्ष झाली. प्रशासनाच्या व शासनाच्या थंडाईने व दिरंगाईमुळे आज धरणग्रस्तांची तिसरी पिढी सुद्धा आयुष्य ठेचकाळत जगत आहे.

मागच्या १२ वर्षांपासून लेंडी धरणाचे काम बंद आंदोलन करून सुद्धा धरणग्रस्तांच्या मागण्या व संपूर्ण सुखसुविधा युक्त पुनर्वसन करण्यास जिल्हा पुनर्वसन विभागाला अपयश आले आहे.

आजही धरणातील संपुर्ण पुनर्वसनाच्या समस्या जशाच्या तशाच आहेत. काही गावांचे पुनर्वसनासाठीचे जमीन अधिग्रहण, सपाटीकरण, सर्वेक्षण, पुनर्वसन, स्वच्छा पुनर्वसन, वाढीव पुनर्वसन अनुदान, सर्व अत्यावश्यक सुविधा म्हणजे पाणी, रस्ता, विद्युत पुरवठा एवढे ही काम प्रशासनाकडून मागच्या १२ वर्षांपासून झाले नाही. ज्या गोष्टीचा जसे की वाढीव पुनर्वसन अनुदान, सानुग्रह अनुदान यांच्या वाटपाचा आणि लेंडी धरणाच्या घळभरणीच्या कामाचा काहीच संबंध नसताना सुद्धा केवळ धरणग्रस्तांना वेठीस धरण्याच काम प्रशासन करीत आहे.

**पहिलं पुनर्वसन मगच धरण -**

हा तर शासन निर्णय आहे. ज्यांना धरणाचे काम १२ वर्षांपासून बंद असताना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करता आले नाही ते प्रशासन काही महिन्यांत पुनर्वसन करण्याचे आश्वासन देत आहे.

असा सर्व समस्यांचा पाढा धरणग्रस्तांनी खासदार यांच्या पुढे वाचला.

खा.रविंद्र चव्हाण यांनी प्रकल्पग्रस्तांचे सर्व सुविधा युक्त पुनर्वसन, वाढीव पुनर्वसन अनुदान, सानुग्रह अनुदान या गोष्टी शासनाने मान्य केल्या आहेत त्या त्वरित वाटप कराव्यात व संपूर्ण १२ गावांचे पुनर्वसन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत धरणाचे काम धरणग्रस्तांच्या मागण्या पदरात पडत नाहीत तोपर्यंत धरणाचे घळभरणीचे काम कायम बंद करा. लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य न झाल्यास प्रकल्पग्रस्त बांधवांसोबत रस्त्यावर सुद्धा संघर्ष करण्याची आपली तयारी असल्याची भावना खासदार यांनी बोलून दाखविली.

**अगोदर पुनर्वसन, मावेजा वाटप मगच धरण -**

धरण ही व्हायला पाहिजे आणि धरणग्रस्तांना न्याय सुद्धा मिळाला पाहिजे असेही खासदार यांनी भावना व्यक्त केल्या. यावेळी सोबत आ.हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर, रामदास पाटील सुमठाणकर, कार्यकारी अभियंता तिडके, मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे स.पो.नि.तिडके, मुक्रमाबाद, दिलिप पा.पांढरे, संघर्ष समितीचे अध्यक्ष राजीव पाटील रावणगांवकर, सचिव उमाकांत वाकडे व लेंडी धरणग्रस्त बारा गावातील हजारो धरणग्रस्त बांधव उपस्थित होते.

तर मुक्रमाबाद येथील काँग्रेसचे युवा नेते दिनेशअप्पा आवडके सह कार्यकर्त्यांनी शहरातील बसस्थानकाच्या मुख्य चौकात १.५० कि.ग्रमचा खोब-याचा हार किरण मशिनच्या सहाय्याने हार घालून यथोच्छित सत्कार केला. यावेळी गंगुसावकार वट्टमवार, संदीप पाटील आतनुरे उपसरपंच चाँदसाब कुरेशी, अनिल बेल्लेवार, राम तेलंग, सद्दाम कोतवाल, समदानी, प्रसाद देवणे, महेमुद चौधरी, आदी उपस्थित होते.

# प्रहारच्या मागणीला यश; शहापूर तालुक्यातील सर्व भात खरेदी केद्रं सुरु



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.२६, शहापूर (ठाणे) :** आदिवासी विकास महामंडळातर्फे आधारभूत किमंत खरेदी योजना २०२४-२५ अंतर्गत शहापूर तालुक्यातील मंजूर भात खरेदी केद्रांपैकी फक्त दोनच केद्रं चालु असल्याने तालुक्यातील शेतकरी चिंतेत होता. म्हणुन प्रहार जनशक्ती पक्ष तालुका अध्यक्ष वसंत पानसरे यांनी मंजुर खरेदी केद्रं लवकर सुरु न केल्यास आक्रमक पविञा घेत आंदोलनाचा इशारा दिला होता याची दखल घेत शहापूर तालुक्यातील सर्व भात खरेदी केद्रं सुरु केल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत आहेत.

शासन निर्णयानुसार डिसेंबर महिन्यात भात खरेदी केद्रं सुरु होणे गरजेचे असतांना देखील आदिवासी विकास महामंडळाच्या भोंगळ कारभारामुळे फेब्रुवारी महिना संपत आला तरी शहापूर तालुक्यातील भात खरेदी केद्रं सुरु झालेले नव्हती.त्यामुळे शेतकऱ्यांनी नोंदणी करुन दोन महिने उलटुनही खरेदीसाठी मेसेज न आल्याने शिवाय ३१ मार्च ही खरेदीची शेवटची तारीख असल्याने शेतकरी देखील चिंताग्रस्त झाला होता. यासाठी अनेक शेतकऱ्यांनी प्रहार कार्यालयात धाव घेऊन व्यथा मांडली होती. म्हणून उप प्रादेशिक व्यवस्थापक यांना निवेदन देत झोपलेली यंत्रणा जागी करण्यासाठी प्रहार तर्फे कार्यालया समोर भजन आंदोलन करण्याचा इशारा तालुका अध्यक्ष वसंत पानसरे यांनी देऊन व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोडे, प्रादेशिक व्यवस्थापक जव्हार पाटील आणि शहापूर उप प्रादेशिक व्यवस्थापक गणेश सालवे यांच्याशी सततचा पाठपुरावा सुरु ठेवल्याने शहापूर तालुक्यातील सर्व भात खरेदी केद्रं सुरु झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

फेब्रुवारी महिना संपत आला तरी भात खरेदी न झाल्याने शेतकरी अडचणीत आला होता. म्हणून तालुक्यातील मंजूर सर्व भात खरेदी केद्रं सुरु करा. या मागणीसाठी प्रहार तर्फे आंदोलनाचा इशारा देऊन पाठपुरावा सुरु होता. खरेदी केद्रं सुरु झाल्याने शेतकरी समाधान व्यक्त करत आहे.

# पिंपरी चिंचवड, ठाणे ग्रामीण, जालना, कोल्हापूर उपांत्यपूर्व फेरीत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मनमाड :** ठाणे ग्रामीण, जालना, कोल्हापूर यांनी ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या किशोर गटात उपांत्यपूर्व फेरी गाठली.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असो.च्या विद्यमाने मनमाड नाशिक येथील स्व. माणकचंद ललवाणी इस्टेट (हेलिपॅड) मैदानातील मॅट वर सुरू असलेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात पिंपरी चिंचवडने पालघरचे आव्हान ४९-३४असे संपुष्टात आणले. पहिल्या डावात अत्यंत चुरशीने खेळलेल्या या सामन्यात पिंपरी चिंचवडेने लोण देत २४-१५ अशी आघाडी घेतली होती.

दुसऱ्या डावात आणखी दोन लोण देत सामना आरामात आपल्या नावे केला. मनीष काळजे, विजय राठोड यांच्या चढाया त्यांना सुशांत वाघमारे याची मिळालेली पिढीची साथ यामुळे हा विजय शक्य झाला. पालघरने दुसऱ्या डावात लोण देत सामन्यात रंगत निर्माण केली. पण विजय मात्र त्यांच्यापासून दूरच राहिला. मंथन पाटील, ध्रुव डोंगरे पालघर कडून उत्कृष्ट खेळले.

ठाणे ग्रामीणने उस्मानाबादला ६०-४५ असे नमवित आगेकूच केली. मध्यांतराला ३३-२४ अशी आघाडी ठाण्याकडे होती. या सामन्यात बोनस गुणाची लयलूट झाली. ठाण्याने एकूण १७, तर उस्मानाबादने ८ बोनस गुणाची नोंद केली. निखिल गायकर, विवेक चोरगे यांच्या झंझावाती खेळाला ठाणे ग्रामीणच्या विजयाचे श्रेय जाते. उस्मानाबादचा विश्वनाथ सुपेकर एकाकी लढला.

जालनाने जळगांवला ५९-२० असे नमवित उपांत्यपूर्व फेरी गाठली. हा सामना तसा एकतर्फी झाला. विश्रांतीला ३२-०८ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या जालनाने नंतर देखील जोषपूर्ण खेळ करीत ३९ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. तुकाराम दिवटे, रितेश आढे यांच्या तुफानी चढायांना जळगावकरांकडे उत्तर नव्हते. प्रतीक आढे यांनी उस्मानाबाद कडून भक्कम बचाव केला. जळगाव कडून रणजीत भिलाल, अजय काशिकर बरे खेळले. कोल्हापूरने औरंगाबादला ४१-२८ असे नमवित आपली विजयी घोडदौड सुरूच ठेवली.

पूर्वार्धात २१-१३ अशी आघाडी घेणाऱ्या कोल्हापूरने उत्तरार्धात संयमाने खेळत सामना १३ गुणांच्या फरकाने जिंकला. हर्षवर्धन पाटील, प्रशांत अकिगे, समर्थ ढोंबरे यांच्या चढाई पकडीच्या खेळाला कोल्हापूरच्या विजयाचे श्रेय जाते. औरंगाबादच्या अजित चव्हाण, देवेंद्र निकम यांनी उत्तम लढत दिली.या अगोदर झालेल्या साखळी सामन्यातून खालील संघानी बाद फेरी गाठली.१) अ गट :- १) पिंपरी चिंचवड, २)अहमदनगर.

२) ब गट:- १)नंदुरबार, २) जळगांव.

३) क गट:- १)कोल्हापूर, २) पुणे शहर.

४) ड गट:-१)सांगली, २)उस्मानाबाद.

५) इ गट:- १)ठाणे ग्रामीण, २) रत्नागिरी.

६) फ गट:- १)परभणी, २) औरंगाबाद.

७) ग गट:- १)जालना, २)नांदेड.

८) ह गट:- १)मुंबई उपनगर पश्चिम,२)पालघर.

# पोक्सो जनजागृतीसाठी तरुणाईने संवेदनशील पुढाकार घ्यावा - अड.खान

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२५, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयामध्ये महाविद्यालय अंतर्गत तक्रार निवारण समिती व अँटी रॅगिंग समिती आणि महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण विधी सेवा समिती खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने पोक्सो कायदा-२०१२ जनजागृतीत तरुणाईचा सहभाग विषयावर दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी विशेष व्याख्यान चे आयोजन करण्यात आले. यावेळी खंडाळा दिवाणी व फौजदारी न्यायालयात कार्यरत ज्येष्ठ विधिज्ञ अड.इम्तियाज खान यांनी प्रमुख म ार्गदर्शन केले. प्रारंभी प्राचार्य डॉ.हणमंत जाधव, अंतर्गत तक्रार निवारण समिती प्रमुख प्रा.अशाली फडतरे यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयीन मार्गदर्शन समुपदेशन करताना अड.खान म्हणाले, बाल्यावस्थेपासून म ुलामुलींच्या व्यक्तिमत्व विकासाला सुरुवात होताना संस्काराचा पाया रचला जातो. संस्कारातून लहान बालकांचा विकास होताना एखादी चुकीची घटना आयुष्यात घडल्यास त्याचा वाईट परिणाम मुलामुलींच्या व्यक्तिमत्व विकासावर होतो. आई-वडील आणि समाज ही बालकाच्या सुरक्षेची बलस्थान असतात. पण समाज वा कुटुंबातील काही विकृतीमुळे बालकांवर लैंगिक अत्याचार होतो.

याच अत्याचाराचा प्रतिबंध करण्यासाठी पोक्सो कायदा २०१२ भारतीय संसदेने संमत केला.पोक्सो अर्थ बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा होय. बालकांवर असा प्रसंग झाल्यास कायदेशीर व वैद्यकीय संरक्षण मिळते.पोलिसांनी त्वरित कृतीत येऊन गुन्हेगारांना अटक करणे अशी कायद्यात तरतूद आहे. यासोबत कठोर शिक्षेची तरतूद आहे. अशा प्रकारचे गुन्हे समाजातील, कुटुंबातील, परिचयातील, अनावधानाने संपर्कात आलेल्या विकृत व्यक्तींकडून घडतात. अलीकडच्या माहिती तंत्रज्ञान युगात इंटरनेटवरील आभासी तंत्र आयुध साहाय्याने लैंगिक छळ, अत्याचार केला जातो. याबद्दल तरुणाईने कृतीतून पुढाकार घेत आपल्या लहान भाऊ-बहिणींना या अत्याचारापासून वेळीच संरक्षित करावे. पालकांमध्ये जनजागृती करावी.

लैंगिक जाणीवा आणि विकृती यावर मुक्तपणे उहापोह होऊन गुन्हा घडण्याआधीचे शहाणपण बद्दल प्रशिक्षण कार्यक्रम हाती घ्यावेत, घडल्यास कुटुंब आणि



पीडिताना मानसिक, बौद्धिक धैर्य देत कायदेशीर मदत मिळणेकामी संवेदनशील होऊन कृती करावी असे आवाहन केले.

प्रास्ताविक (लैंगिक छळ प्रतिबंध समिती सदस्य) डॉ.प्रतिभा पाटणे, अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ.हणमंत जाधव, आभार प्रा.अमीर इनामदार तर सूत्रसंचालन प्रा.प्रतिक्षा माने यांनी केले. छायाचित्रण विद्यार्थी अभिषेक शितोळे यांनी केले. यावेळी महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण खंडाळा विधी सेवा समिती कार्यवाह प्रविण घाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच म हाविद्यालय विविध विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

# थोडक्यात

## हर हर महादेव च्या गजरात दमदुमला परिसर

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२६, पानगाव (लातूर) :** दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्र निमित्त पानगाव परिसरातील सर्व महादेव मंदिरामध्ये रात्री पासून भविक भक्तांनी गर्दी केली होती. येथील ब्राह्मण गल्ली येथील श्री पनगेश्वर मंदिरा मध्ये सकाळी ५ वाजल्यापासून भाविक भक्तांची गर्दी होणास सुरवात झाली होती. सकाळी ५ वाजता मंदिर मंदिर समिती कढून महाअभिषक करण्यात आला. तसेच पानगाव येथील पचकुंड महादेव मंदिर या ठिकाणी सुद्धा सकाळी ५ वाजल्यापासूनच भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. पंचकुंड महादेव मंदिरावर आकर्षक विदयुत रोषणाई करण्यात आली होती. तसेच डॉ संजय हरिदास यांच्या वतीने फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. यावर्षी प्रयागराज येथे सुरु असलेल्या महाकुंभ मेळ्यामुळे या वर्षीच्या शिवरात्रीला विशेष महत्व प्राप्त झाल्याचे पहावयास मिळाले. सकाळी ५ वाजल्यापासून पानगाव येथील सर्वच महादेव मंदिरामध्ये भक्तांनी दर्शनासाठी व पूजेसाठी गर्दी केली होती. यामध्ये महिलांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाले. एक लोटा जल हर समस्या का हल असे शिवपुराण कर्ते प्रदीप मिश्रा महाराजनी सांगितल्यामुळे एक लोटा जल अर्पण करण्यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.

# अंबरनाथमध्ये म्हाडा साकारणार अडीच हजार घरे

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२५, अंबरनाथ (ठाणे) :** दिवसेंदिवस शहराचा झपाट्याने विकास होत असतांना टोलेजंग इमारतींचे समूह शहराच्या पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही भागात निर्माण होत आहेत. मात्र या इम ारतींमध्ये तयार होणाऱ्या घरांच्या किमती देखील गगनाला भिडणाऱ्या असतात. त्यामुळे मध्यम व आर्थिकदृष्ट्या कम कुवत असलेल्या कुटुंबीयांना आपल्या हक्काच्या घराचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक वर्ष वाट पहावी लागते. त्यामुळे अर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेली कुटुंब म्हाडाच्या माध्यमातून आपल्या घराचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करतात.




त्यामुळे अर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना देखील आपल्या हक्काचं घर विकत घेता यावं यासाठी म्हाडाने आपला विस्तार अंबरनाथ पर्यंत वाढवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.म ुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली प्रमाणेच अंबरनाथ मध्ये देखील म्हाडाने स्वस्त घरे निर्माण करण्यासाठी दोन गृहप्रकल्प प्रस्तावित केले आहेत. त्यामुळे म्हाडाची कक्षा आता अंबरनाथ. पर्यंत वृंदावताना दिसून येते आहे. अंबरनाथमध्ये पूर्व आणि पश्चिम भागात म्हाडाच्या कोकण मंडळाकडून दोन गृहनिर्माण प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले असून नागरिकांची मागणी जाणून घेण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या सर्वे क्षणाच्या मदतीने म्हाडाला घरे उभारताना सोयीस्कर ठरणार आहे.या दोन गृहप्रकल्पांमध्ये एकूण २५३१ सदनिका बांधण्यात येणार आहेत. तसेच ही घरे खरेदी करण्यासाठी अत्यल्प आणि म ध्यम उत्पन्न असे दोन गट केले आहेत.

यामध्ये अत्यल्प गट ६ लाख आणि मध्यम गट ९ ते १२ लाख उत्पन्न असे दोन गट करण्यात आले आहेत. उभारण्यात येणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी जनतेची मागणी जाणून घेण्यासाठी म्हाडाने ऑनलाइन गृहनिर्माण मागणी सर्वेक्षण सुरू केले आहे. या सर्वे क्षणामुळे या प्रकल्पांसाठी व्यवहार्यता अहवाल अंतिम करण्यापूर्वी संभाव्य अर्जदारांची अंदाजे संख्या कळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सर्वेक्षणात सहभागी होण्याचे आवाहन म्हाडाच्या कोकण मंडळाने केलं आहे. त्यामुळे अंबरनाथ सारख्या शहरात देखील म्हाडाची घरे नागरिकांसाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

१) पूर्वेच्या शिवगंगा नगर परिसरात ओपन प्लॉट सर्वे नंबर ३८ (झ), ७०, ७८ याठिकाणी ९२५ सदनिका होणार असून यामध्ये अत्यल्प उत्पन्न गट १५१ आणि मध्यम उत्पन्न गट ७७४ सदनिका होणार आहेत.

२) तसेच पश्चिमेला कोहोज खुंटवली येथील ओपन प्लॉट सर्व्हे नंबर ४५/१/इ, ४३/५, ४२/३, ४२/४ याठिकाणी अत्यल्प उत्पन्न गटासाठी १६०६ सदनिका होणार आहेत. म्हाडाने सर्वेक्षण सुरू करताच नागरिकांनी उत्फ ूर्तपणे अर्ज करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे आत्तापर्यंत या दोन्ही गृहप्रकल्पांसाठी ३३०५ अर्ज प्राप्त झाले असू यामध्ये शिवगंगा नगर येथील घरांसाठी १६२९ आणि कोहोज खुंटवली येथील घरांसाठी १६७६ पेक्षा अधिक अर्ज म्हाडाकडे प्राप्त झाले आहेत. दोन्ही प्रकल्पाकरिता ५००० पेक्षा अधिक अर्ज येण्याचा अंदाज म्हाडाने व्यक्त केला आहे.हे दोन्ही प्रकल्प मार्च २०२५ मधे उभारणीचे काम सुरू होण्याची शक्यता असून मार्च २०२८ पर्यंत काम पूर्ण होण्याची शक्यता म्हाडाच्या कोकण मंडळाने व्यक्त केली आहे.

दोन्ही गृहप्रकल्पांमध्ये दुकाने गाळे, पार्किंग व्यवस्था, रिक्रिएशनल ग्राउंड, सीवेज ट्रीटमेंट प्लांट, रेन वॉटर हार्वेस्टींग प्लांट, ऑर्गेनिक वेस्ट कन्व्हर्टर यूनिट, सोलार सिस्टम अशा सोयीसुविधा उपलब्ध असणार आहेत. दरम्यान या सर्वेक्षणात सहभागी होण्यासाठी इच्छुक नागरिक https://demandassessmentcitizen.mhada.gov.in/bm भेट देऊन आणि आवश्यक तपशील देऊन सर्वेक्षणात सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी, नागरिक म्हाडा कोकण मंडळाशी ०२२-६६४०५२४९ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. असे आवाहन म्हाडाच्या कोकण मंडळाने केले आहे.

## अमरावती जिल्ह्यात सरपंचाला बेदम मारहाण




**दि.२६, अमरावती :** जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील उपराई येथील सरपंचाला बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.ग्रामपंचायतीच्या घरकुलांच्या यादीमध्ये नाव न आल्याच्या कारणावरून काही लोकांनी सरपंचावर हल्ला केला. जखमी सरपंचावर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपराई येथील सरपंच नीरज नागे हे मंगळवारी रात्री घरी जेवण केल्यानंतर मित्रांसमवेत बाहेर जात असताना अचानक काही लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यांना दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अमरावती येथील रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेमुळे गावात रोष व्यक्त केला जात असून हल्लेखोरांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.मी सरपंच झाल्यानंतर गावातील काही मुस्लीम समुदायातील लोक मला भयंकर त्रास देत होते. गेल्या चार दिवसांम ध्ये घरकुलांच्या यादीत त्यांचे नाव न आल्याने त्यांनी मला ठार मारण्याची धमकी दिली होती. मी या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार देखील दिली होती. माझ्या जिवाला धोका असल्याचे मी तक्रारीत नमूद केले होते. मला सुरक्षा पुरविण्यात यावी, अशी मागणीही मी केली होती. दरम्यान मी काल जेवण केल्यानंतर मित्रांसोबत मी जात असताना काही लोकांनी मागून माझ्यावर हल्ला केला. दगड आणि पाईपने मला मारहाण करण्यात आली. मी त्यांच्या तावडीतून सुटका करण्याचा प्रयत्न केला आणि जवळच्या झुडूपांमध्ये जाऊन लपलो. माझ्या मित्रांनी मला रुग्णालयात आणले, असे नीरज नागे यांनी सांगितले.

मी सरपंच झाल्यापासून काही लोक माझ्यावर राग ठेवून आहेत. मी शिवसैनिक आहे आणि बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र लावल्यामुळे काही ग्राम पंचायत सदस्यांनी मला विरोध केला होता, असेही नीरज नागे यांचे म्हणणे आहे. काही लोकांनी माझ्याविषयी द्वेषभावना ठेवून त्रास देण्यास सुरूवात केली होती. आपण आजवर संयम बाळगला, पण काही लोकांनी आपल्यावर हल्ला केला, असेही नीरज नागे यांनी सांगितले.

# पनवेल महानगरपालिकेचे ३८७३ कोटी ८६ लाखाचे अंदाजपत्रक जाहीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, पनवेल :** महानगरपालिकेचे सन २०२५ - २०२६ चे ३८७३ कोटी ८६ लाखाचे वस्तुनिष्ठ, विकासाभिमुख, कोणतीही करवाढ नसलेले अंदाजपत्रक मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे यांनी प्रशासकीय स्थायी समितीच्या बैठकीमध्ये आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्याकडे सुपूर्त केले. महापालिकेच्या या अंदाजपत्रकांमध्ये महापालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधाबरोबरच गतिमान प्रशासनासाठी विविध उपाययोजनांवरती भर देण्यात आला आहे.

उत्पन्न वाढीवर भर देणारा, आरोग्य सुविधांची वृद्धी करणारा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नव्या शैक्षणिक संकल्पनांचा प्रभावी वापर करणारा, भविष्याचा दुरगामी विचार करुन नव्या जलस्रोतांचा शोध घेणारा, शहर स्वच्छ करण्यासाठी लोकसहभागावर भर देणारा, पर्यावरण संरक्षण व संवर्धन करणारा अर्थसंकल्प असल्याचे प्रतिपादन आयुक्तांनी यावेळी केले.

**बांधकाम विभाग :**

या अर्थसंकल्पामध्ये महापालिकेच्या प्रस्तावित बांधकाम विभागाच्या कामांमध्ये स्वराज्य नविन प्रशासकीय इमारत- १५८ कोटी, महापौर निवासस्थान व नवीन प्रभाग कार्यालये बांधकाम ासाठी- रु.३८ कोटी, रस्त्यांचे काँक्रिटीकरण व डांबरीकरण- रु.४३७ कोटी, क्रिडांगणे- रु.५७ कोटी प्रस्तावित करण्यात आले आहे. खारघर येथे नगरवाचन मंदिर व नाट्यगृह व वाचनालय बांधणी करिता १४ कोटीचा निधी अंदाजपत्रकात ठेवण्यात आला आहे. याचबरोबर माता रमाबाई आंबेडकर



भवन, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह यासाठी भरीव तरतूद या अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. पनवेल शहरात गाढी नदी लगत पूर प्रतिबंधक बंधारा बांधणे व पंपिंग स्टेशन उभारणीसाठी यावर्षीच्या अंदाजपत्रकात १७.५० कोटीची भरीव तरतूद करण्यात आली आहे.पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली नोड मधील होल्डींग पॉड (धारण तलाव) येथील गाळ काढणे व इतर अनुषांगिक उपाय योजना करण्यासाठी यावर्षी ३५ कोटीची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे.

घनकचरा व आरोग्य :यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये पनवेल महानगरपालिकेला स्वच्छ भारत मिशनमध्ये क्रमांक मिळविण्याच्या हेतूने चार प्रभागांसाठी मेगा स्विपिंग मशीनससाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच धूळ नियंत्रणाकरिता विविध उपाययोजना करण्यासाठी ११.३८ कोटी निधीची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे.

**वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारणे व संचलित करणे :**

पनवेल महानगरपालिका सिडको प्राधिकरणासोबत कचऱ्यापासून उर्जा निर्मिती (वेस्ट टू एनर्जी प्रोजेक्ट) या प्रकल्पामध्ये सहभागी होत आहे. सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात १० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. एकुणच घनकचरा संकलन, वाहतूक व मनुष्यबळ इ काम ासाठी २२१ कोटीचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**वैद्यकीय व आरोग्य सेवा :** नागरिकांना वैद्यकीय व आरोग्य सेवा पुरविण्यावर महापालिका कायमच भर देत आली असून यासाठी यावर्षी १२६ कोटी रूपयांचा निधी या अंदाजपत्रकात ठेवण्यात आला आहे. याबरोबर पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये हिरकणी माता व बाल संगोपन केंद्र -सर्व समावेशक ४५० बेडचे हॉस्पीटल उभारणीसाठी यावर्षीच्या अंदाजपत्रकात रु.१७.५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. काळुंद्रे, नविन पनवेल, खारघर येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे(यूपीएचसी) बांधकाम प्रगतीपथावर आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब कळंबोली येथे ५० बेडचे हॉस्पिटल बांधण्याकरिता १० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

**अग्निशमन व सुरक्षा व्यवस्थापन-रु.३९ कोटी निधीची तरतूद :**

पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी ०१ नग ॲडव्हान्स फायर इंजिन व ०१ नग ॲडव्हान्स इमरजन्सी रेस्क्यू टेंडर अशी २ वाहने तसेच टर्नटेबल लेंडर २२ मीटर, वाहन बॉडी बांधणी व पुरवठा करण्यात आले आहे. तसेच वॉटर बाउझर वाहन खरेदीसाठी ७.३५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी ७० म ीटर उंचीचे अरायल लॅडर प्लॅटफॉर्म वाहन खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच कामोठे येथे अग्निशमन केंद्र बांधणे १७ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

**भुयारी गटार व मलनि:सारण - रु.१७८ कोटीची तरतूद :**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे मलनि:सारण केंद्रांतर्गत १५ दललि क्षमतेचे पाणी पुर्नवापर प्रक्रिया केंद्र (टीटीपी) उभारणीसाठी सन २०२५- २६ च्या अंदाजपत्रकात तरतूद रु.४० कोटी करण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील से. १९, २०, २१ करिता ६.५ दललि क्षमतेचे मलनि:सारण केंद्र उभारणीसाठी २५.४९ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

**शाळा व अनुषंगीक कामे :**

नूतन शाळा बांधकामासाठी ३४ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. मनपा शाळांना शैक्षणिक सोयी-सुविधा, शिक्षक वेतन तसेच विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य वाढीसाठी ८३ कोटीची भरीव तरतूद करण्यात आली आहे. पनवेल म हानगरपालिका हद्दीतील रायगड जिल्हा परिषदेने बांधलेल्या शाळेची दुरुस्ती करण्यासाठी १०.७२ कोटीचा निधी अंदाजपत्रकात ठेवण्यात आली आहे.

**शहरातील प्रमुख चौक, प्रवेशद्वार, कार्यालय सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे :**

महानगरपालिका हद्दीमध्ये महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व व्यापक जनहितार्थ मुलभूत उपाययोजना करणे सीसीटीव्ही काम प्रगतीपथावर आहे. यासाठी २०२५- २६ च्या अंदाजपत्रकात रु.१०७ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

यावेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे , लेखा अधिकारी डॉ.संग्राम व्होरकटे, उपमुख्य लेखापरिक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.